# डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

## कृषी संशोधन केंद्र, वाशीम -४४४५०५

**Dr. B.D. Gite** **Email-washimars@gmail.com**
**M.Sc. (Agri), Ph.D.** **Mob No.8668907169**

---

**जा.क्र./कृ.सं.कें/वाशीम/कंत्राटी कामे निविदा /५७/२०२६ -२७** **दिनांक:** २७ /०५ /२०२६

**<u>निविदा सूचना</u>**

**प्रती ,**

**---------------------------**

**---------------------------**

विषय :-सन २०२६-२७ करीता कृषि संशोधन केंद्र, वाशिम अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेतीशी निगडीत सर्वच कामे करण्यासाठी वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निविदा दर बोलविणे बाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कृषि संशोधन केंद्र, वाशिमअंतर्गत प्रक्षेत्रावरील शेतीशी निगडीत सर्वच कामे कंत्राटी पद्धतीने करणे साठी सोबत दिलेल्या विहित प्रपत्रात नमूद कामाचे प्रती हे., प्रती क्वी., प्रती तास अशा प्रकारचे निविदा दर वैध परवाना धारक कंत्राटदारकडून खालील प्रमाणे अटी व शर्ती च्या अधीन राहून मागविण्यात येत असून इच्छुक कंत्राटदारांनी आपल्या निविदा दि.०२.०६.२०२६ पर्यन्त सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या कार्यालयास पाठवाव्यात.

**सोबत- नमूद कामाचे विहित प्रपत्र .**

**स्वाक्षरीत /-**
**प्रभारी अधिकारी**
**कृषि संशोधन केंद्र**
**वाशिम.**

| अ.क्र . | संस्था / करावयाचे काम | तपशील | दर (रु) / प्रती हे./ प्रती तास/प्रती क्वी |
|---|---|---|---|
| **संस्थेचे नाव -** | | | |
| १ | ट्रॅक्टर ने नांगरणी करणे | २ फाळ | |
| २ | ट्रॅक्टर ने पेरणी करणे | पट्टी पास सह | |
| | | बिबीएफ यंत्रा सह | |
| | | विना पट्टी पास | |
| ३ | ट्रॅक्टर ने रोटा व्हेटर मारणे | ५ फुट लांब | |
| ४ | ट्रॅक्टर ने काकर पाडणे | ४५ सेमी | |
| | | ६० सेमी | |
| | | ९० सेमी | |
| | | १२० सेमी | |
| | | १५० सेमी | |
| ५ | ट्रॅक्टर ने पट्टी पास मारणे | जांभूळवाही | |
| ६ | ट्रॅक्टर ने पंजी वाही करणे | ५ फाळ | |
| ७ | ट्रॅक्टर ने डवरणी करणे | डवरणी यंत्रासहित | |
| | | ४५ सेमी | |
| | | ६० सेमी | |
| | | ९० सेमी | |
| | | १२० सेमी | |
| | | १५० सेमी | |
| ८ | ट्रॅक्टर ने शेती संबंधित तिन्ही हंगामातील कामे करणे ( ट्रॅक्टर चालक) | प्रती मजूर/ ८ तास | |
| ९ | कार्यालयातील दैनंदिन कामे जसे कार्यालय उघडणे व बंद करणे तसेच कार्यालय साफ सफाई करणे | प्रती मजूर/ ८ तास | |
| १० | शेतीशी निगडीत कामे करण्यासाठी कुशल मंजूर | प्रती मजूर/ ८ तास | |
| ११ | शेतीशी निगडीत कामे करण्यासाठी कुशल मंजूर | प्रती मजूर/ ८ तास | |
| १२ | भांडार गृह मदतनीस ( बियाणे बॅग शिवणे, बियाणे आवक जावक नोंदी घेणे ) | प्रती मजूर/ ८ तास | |
| १३ | संगणक परिचालक | प्रती मजूर/ ८ तास | |
| १४ | बैल जोडीने ने डवरणी करणे | डवरणी यंत्रासहित | |
| | | ४५ सेमी | |
| | | ६० सेमी | |
| | | ९० सेमी | |
| | | १२० सेमी | |
| | | १५० सेमी | |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | कश्या /धसकटे /कचरा वेचणे. | प्रती हेक्टर | |
| १६ | शेणखत भरण/ उतरविने/ वाहतूक ५ टन | वाहन व मजुरासह(५किमी अंतर जाने येणे) | |
| १७ | शेणखत पसरविणे | प्रती हेक्टर | |
| १८ | टोकन पद्धतीने पेरणी | जास्त अंतर (९०ते १२० सेमी ) | |
| | | कमी अंतर (३०ते ६० सेमी ) | |
| १९ | फवारणी करणे (तणनाशक, कीटकनाशक, बुरशीनाशक, सूक्ष्म अन्नद्रव्ये ई.) | मजुरासहित प्रती हे. | |
| | | ट्रक्टर बूम स्प्रे प्रती हे. | |
| २० | विरळणी करणे | जास्त अंतरा वरील पिक (९०ते १२०सेमी ) | |
| | | कमी अंतरावरील पिक (३० ते ६० सेमी) | |
| २१ | खुरपणी/निंदण | खरीप | |
| | | रब्बी | |
| | | उन्हाळी | |
| २२ | वरखत देणे | सर्त्याद्वारे | |
| | | बांगडी पद्धत | |
| | | हाताने फेकणे | |
| २३ | पिकाला पाणी देणे | मोकाट पद्धत | |
| | | स्प्रिंकलर पद्धत | |
| २४ | पिकाला पाणी देन (इंजिन स्प्रिंकलर संच डीझेल व मजुरांसह ) | डीझेल इंजिन ३० पाईप,८ नोझल प्रती हेक्टर | |
| २५ | फवारणी करणे | साधा स्प्रे प्रती हेक्टरी | |
| | | पावर स्प्रे प्रती हेक्टरी | |
| | | पावर स्प्रे (प्रती तास पेट्रोल सह) | |
| | | ट्रक्टरने बूम स्प्रे पंपाद्वारे प्रती हेक्टर | |
| २६ | पिक काढणे/कापणी करणे | मुंग शेंगा तोडणे, बडविणे व उधळणे | |
| | | सोयाबीन / उडीद कापणी व खळयावर जमा करणे | |
| | | ज्वारी /मका /बाजरी कापणी व बांधणी,कणस खुडण,खळयावर जमा करणे | |
| | | गहू कापणे व बांधणे खळयावर जमा करणे | |
| | पिक काढणे/कापणी करणे | तूर कापणी व बांधणी,जमा करणे बडविणे व उपनने आणि पोते भरणे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | . | |
| | | भुईमुग काढणी, शेंगा तोडणे व पिक जमा करणे . | |
| | | जवस,चीया ,फॉक्स टेल मिलेट काढणे,व गोळा करणे,बडविणे व उपनाने | |
| | | करडई कापणे बांधणे गोळा करणे | |
| | | हरभरा कापणे बांधणे गोळा करणे | |
| २७ | पिकांची मळणी करणे | प्रति क्विंटल (ट्रॅक्टर ,थ्रेशर मजुरांसह पोते भरणे, शिवणे) | |
| | सोयाबीन | | |
| | तूर | | |
| | उडीद /मुंग | | |
| | गहू/ज्वारी | | |
| | हरभरा | | |
| | चीया | | |
| | जवस | | |
| | फॉक्सटेल मिलेट | | |
| | मका | | |
| २८ | | यंत्राने पिक काढणे कम्बाईन हार्वेस्टर(विभागवरील सर्व पिके ) | |
| २९ | वळइ रचणे | १०००पेंड्यासाठी | |
| ३० | चाळणी वजन | चाळणी करून वजन करणे (प्रति क्विंटल) | |
| ३१ | बियाणे लोडिंग व अन्लोडिंग करणे (हमाली ) | लोडिंग व अन्लोडिंग (प्रति क्विंटल) | |
| ३२ | बियाणे चाळणीकरीता / विक्रीकरिता डॉ पं दे कृ वि अकोला , येथे नेणे किंवा तिथून आणणे | वाहनासहित (प्रती क्विंटल) | |
| ३३ | बियाणे चाळणीकरीता / विक्रीकरिता कृषि उत्पन्न बाजार समिति वाशिम, महाबीज, वाशिम ,FPO वाशिम येथे नेणे किंवा तिथून आणणे | वाहनासहित (प्रती क्विंटल) | |
| ३४ | विद्यापीठ निर्मित जैविके, खते , औषधे अकोला येथून वाशिम येथे आणणे | वाहनासहित (प्रती क्विंटल) | |
| ३५ | वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणने व भांडार विभागात ठेवणे | वाहनासहित (प्रती क्विंटल) | |
| ३६ | उस/ हळद लागवड | प्रति हेक्टर | |
| ३७ | पोत्याची थप्पी लावणे (प्रति क्विंटल) | (प्रति क्विंटल) | |
| ३८ | ट्रॅक्टर ने दांड तयार करणे/ बेड तयार | प्रति हेक्टर | |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणे | | |
| ३९ | उपटतण काढणे (आडन काढणे ) | प्रति हेक्टर | |
| ४० | बिजोत्पादन मधील भेसळ काढणे | प्रति हेक्टर | |
| ४१ | प्रक्षेत्रावरील पिक राखणे( सर्व साहित्यासह उदा. गम बूट, टॉर्च, काठी, शिटी ई.) | १०हेक्टर व प्रति दिवस( २४ तासा करीता | |
| | | | |

**<u>अटी व शर्ती</u>**

०१. कंत्राट दाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

०२. ई-निविदा मधील संबंधित कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील करा संबंधी कोणतीही तक्रार असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही

०३. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बीजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र विकास विभाग कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री पुरुष मजुरांची व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील

०४. प्रक्षेत्रावरील विभागावर बीज उत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र विकास विभाग इतर विभाग संबंधित तांत्रिक कामे करतेवेळी कुठली दुर्घटना अपघात जीवित हानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील

०५. विभागावर देण्यात आलेले बीजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र विकास विभाग व इतर विभाग संबंधित तांत्रिक कामे पूर्ण करण्यात यावे कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

०६. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

०७. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही

०८. प्रक्षेत्रावरील विभागावर बीज उत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री पुरुष मजुरांना कामगार लेबर ॲक्टनुसार किमान वेतन विमा संरक्षण भविष्य निर्वाह निधी देणे कॅशलेस पद्धतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा नियमाने व नियमित भरणा करणे इत्यादींची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराचे राहील.

०९. क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र व इतर विभाग संबंधित कामे करीत असताना कोणताही वादविवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद मा. प्रभारी अधिकारी यांची समक्ष मिटवला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील

१०. प्रक्षेत्रावर तांत्रिक कामे किंवा शेतीची कामे खरीप रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगाम करिता असून कामाचे दर तीनही हंगामासाठी सारखेच राहतील.

११. बीज उत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीज प्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबंधित तांत्रिक कामे करण्यासाठी पूर्णत आलेले कंत्राटी कर्मचारी हे 18 वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१२. कंत्राटदार मार्फत पुरवण्यात येणाऱ्या ट्रॅक्टर चालक यांच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना असणे बंधनकारक आहे

१३. दर कामे ही पूर्णता बाह्य स्त्रोतामार्फत कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याकारणाने मजुरांच्या ज्येष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.

१४. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे किंवा काढून टाकने याबाबत संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे असतील

१५. कामावरील कंत्राटी कामगारास अपघात विमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी खाते व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुरांचे देह लाभ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवणारा कंत्राटदार किंवा संस्था यांची राहील.

१६. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा ,ग्रॅज्युएटी, बोनस ,विमा योजना, पीएफ ,ईएसआयसी इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/ वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील याबाबत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालया ची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.

१७. कंत्राटदराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा.हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद ,दैनंदिन कामाच्या नोंदी ,इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते संबंधित प्राधिकरणाद्वारे तपासून घेणे बंधनकारक असून त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार किंवा पुरवठादाराची राहील

१८. कामगाराच्या वैयक्तिक खात्यावर पीएफ विमा व इतर भरणा केलेले चलन पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सादर करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

१९. कार्यालयाकडून विलंबाने देत जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील पाच तारखेपर्यंत संबंधित मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती इएसआयसी ,पी एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलन प्रत्येक महिन्यात देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२०. कंत्राट दराकडून वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राट मजुरांची काम समाधानाकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा कंत्राट तातडीने रद्द करण्यात येईल

२१. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित दर पत्रकात नमूद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शवल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीला राहतील तसेच द्वितीय क्रमांकाच्या दरपत्रक धारकाने असमर्थता दर्शविल्यास तृतीय क्रमांकाच्या लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क दर पत्रक समितीच राहील

२२. कंत्राटी कामे करीत असताना वस्तू व सेवा कर २ % व आयकर टीडीएस १ % हे देयक रकमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

२३. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरू असताना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वतः अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही तर सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२४. क्षेत्रावर पीक राखण करीत असताना कंत्राटदार तर्फे नेमण्यात आलेल्या पहारेकरी कडून कर्तव्यात हलगर्जीपणा झाल्यास आणि त्या अनुषंगाने पिकांचे नुकसान झाल्यास संबंधित कंत्राटदारास सदर पिकाची नुकसान भरपाई देणे बंधनकारक राहील

**स्वाक्षरीत /-**
**प्रभारी अधिकारी**
**कृषि संशोधन केंद्र**
**वाशिम.**